Maharashtra State Board
Of Secondary & Higher
Secondary Education
Latur Divisional Board
Latur-413531

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
लातूर विभागीय मंडळ,
लातूर- ४१३५३१

सुतामल एरिया,कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानन नगर, लातूर
Divisional Chairman Ph :( O) 229258 Divisional Secretary Ph :( O) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com

जा.क्र.लाविमं / माध्य.अ / 1728

**परीक्षा प्राधान्य / महत्वाचे**

दिनांक :– 18/11/2025

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा
लातूर / नांदेड / धाराशिव.

**विषय:–** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.10वी) फेब्रु–मार्च 2026 विद्यार्थ्यांची अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...

**संदर्भ:–** क.रा.मं. / परीक्षा–8 / 3949 दि. 17 / 11 / 2025

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, फेब्रु–मार्च 2026 मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षेस प्रविष्ट होणा–या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दिनांक 17 / 11 / 2025 रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची निर्धारित मुदत संपल्यानंतर (1) श्रेणी / तोंडी / प्रात्यक्षिक परीक्षा सुरू होण्यापूर्वी 30 दिवसाचा कालावधी वगळून त्याआगोदर प्रति विद्यार्थी प्रतिदिन रू 50 / – याप्रमाणे अतिविलंब शुल्क (2) अतिविलंब शुल्काच्या निधारित तारखेनंतर लेखी परीक्षा किंवा प्रात्यक्षिक परिक्षेच्या आगोदर जी परीक्षा सुरू होणार आहे, त्यातील सुरूवातीच्या 15 दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रू 100 / –विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या 15 दिवसाकरीता व परीक्षेच्या आगोदरच्या दिवसापर्यंत म्हणजेच दि. 19 / 02 / 2026 पर्यंत प्रति विद्यार्थी प्रतिदिन रू 200 / – प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारून आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

लेखी परीक्षा दिनांक 20 / 02 / 2026 रोजी सुरू झाल्यानंतर कोणत्याही नियमित, पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार, खाजगी विद्यार्थी, तुरळक व आय. टी. आय. विषय घेणा–या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

| अ.क | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रू 50 / – प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रू 100 / – प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रू 200 / – प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षा | मंगळवार, दि.18 / 11 / 2025 ते शुक्रवार, दि. 02 / 01 / 2026 | शनिवार, दि. 03 / 01 / 2026 ते शनिवार, दि. 17 / 01 / 2026 | रविवार, दि. 18 / 01 / 2026 ते गुरूवार, दि. 19 / 02 / 2026 |

1. सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळेने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र Online भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्क Online पध्दतीने चलन तयार करून चलनावर नमुद ICICI बँकेच्या Virtul Acount मध्ये कोणत्याही बँकेद्वारे त्याच दिवशी Online जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application Status मध्ये Send To Board व Payment Status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे Status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्रहय धरण्यात येतील विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व चलने स्विकारून व त्याचे Status ची खात्री करून पुढील कार्यवाही करावी. शाळेने व कनिष्ठ महाविद्यालयाने चलन उशीरा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबधीत विलंबाची यथायोग्य फी संबधीत शाळेकडून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
2. मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल, तसेच त्याचा निकाल व इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब माध्यमिक शाळामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी. **तसेच कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

**सोबतः—परिशिष्ट 'अ'**

विभागीय सचिव,
लातूर विभागीय मंडळ, लातूर

**प्रत माहितीस्तव :—**

1. मा. सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
2. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर.

**प्रत माहितीस्तव कार्यवाहीसाठी :—**

1. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. लातूर / नांदेड / धाराशिव

## परिशिष्ट-अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नावः ------------------------------

विभागीय मंडळाचे नावः ------------ विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांकः --------------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ.१० वी**

१. विद्यार्थ्यांचे नाव : ------------------------------------------------

२. शाळेचे नाव व पत्ता : ----------------------------------------------

३. शाळेचा सांकेतांक क्रमांक : -------------------------------------------

४. विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार

ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती

ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

५. उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

६. ------------------------ २. --------------------------

३. ------------------------ ४. --------------------------

१०. ----------------------------------------------------

--

(याबाबत नियमित विद्यार्थ्यांची हजेरी तपासून सदरचे कारण ग्राहय धरावे.)

६. शाळा प्रमुखांची शिफारस :-

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का**

अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला - रोख/चलन क्रमांक ------------------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ---------------------------------------

---------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

**विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,**
**विभागीय मंडळाचे नाव व शिक्का**